# श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र. ०३/२००५.** **दिनांक-०४ फेब्रुवारी, २००५.**

**स्थळ - शिर्डी कार्यालय.** **वेळ दुपारी-२.००वाजता.**

श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सभा शिर्डी येथे शनिवार दिनांक ०४ फेब्रुवारी, २००५ रोजी आयोजित करणेत आली असलेबाबत इकडील दिनांक २९ जानेवारी २००५ रोजीचे पत्राने सर्व सदस्यांना कळविणेत आले होते. त्यानुसार सदरहू सभा शनिवार दिनांक ०४ फेब्रुवारी, २००५ रोजी दुपारी २.३० वाजता संस्थानचे शिर्डी येथील कार्यालयात मा. अध्यक्ष श्री. जयंत मुरलीधर ससाणे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालीलप्रमाणे व्यवस्थापन समिती सदस्य तसेच निमंत्रित मान्यवर उपस्थित होते.

**(अ) श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)**

| | | | |
|---|---|---|---|
| ०१. | मा. श्री. जयंत मुरलीधर ससाणे, अध्यक्ष | ०२. | मा. श्री. शंकरराव गेणूजी कोल्हे, उपाध्यक्ष |
| ०३. | मा. श्री. राधाकृष्ण एकनाथ विखे पाटील | ०४. | मा. श्री. पांडूरंग गमाजी अभंग |
| ०५. | मा. श्री. सुरेश गोरक्षनाथ वाबळे | ०६. | मा. डॉ. एकनाथ भागचंद गोंदकर |
| ०७. | मा. श्री. अशोक भिमाशंकर खांबेकर | ०८. | मा. श्री. कैलास गोविंदराव कोते (नगराध्यक्ष) |

मा. श्री. भाऊसाहेब रा. वाकचौरे
कार्यकारी अधिकारी

**(ब) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ,मुंबई-**

| | | |
|---|---|---|
| ०१. | मा.श्री.अनिलकुमार लखिना, | उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक |
| ०२. | मा.श्री.मराठे, | उपव्यवस्थापकीय संचालक |
| ०३. | मा.श्री.डी.बी.देशपांडे, | मुख्य अभियंता |
| ०४. | मा.श्री.शैलेश माहीमतुरा, | संचालक |
| ०५. | मा.श्री.पी.एल.खातू, | कन्सल्टंट |

**(अ) शिर्डी नगरपंचायत, शिर्डी-**

| | | |
|---|---|---|
| ०१. | मा.श्री.विजय जगताप, | उपनगराध्यक्ष |
| ०२. | मा.श्री.सुदामराव गायकवाड, | मुख्याधिकारी |

सभेच्या सुरुवातीस श्रीसाईबाबांची प्रार्थना करणेत येऊन शासन अधिनियमातील कलम ११ (२) नुसार आवश्यक गणपूर्ती असल्याने सभेचे कामकाज मा. अध्यक्ष श्री.जयंत मुरलीधर ससाणे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आले.

यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.

**विषय नं.०१.** **शिर्डी शहराचे विकास आराखड्याबाबत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांचे समवेत चर्चा करणे.**

**निर्णय क्र.६५.** मा.अध्यक्ष आमदार श्री.जयंतराव ससाणे यांनी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, मा.श्री.अनिलकुमार लखीना व त्यांचे सहकारी अधिकारी यांचे प्रथमत: स्वागत करुन सुधारित शिर्डी विकास आराखडा तयार करण्यासाठी त्यांचे अनुभव व मार्गदर्शन फार उपयोगी होईल. सदर आराखडा तयार करताना पुढील २५ वर्षे होणाऱ्या बदलाचे स्वरुप विचारात घेऊन तयार करावा असे प्रास्ताविक केले.

मा.उपाध्यक्ष श्री.शंकरराव कोल्हे,माजी आमदार यांनी, शिर्डी येथे भविष्यात २५वर्षानंतर दर्शनार्थींची संख्या दररोज ५ लाखापर्यंत जाईल. करिता विकास आराखडा तयार करताना शिर्डीचे दक्षिणेस व उत्तरेस २५ ते ३० एकराचे कॅम्पींग ग्राऊंड (Comping Ground) असणे आवश्यक आहे. रस्त्यावर सध्या शनि-शिंगणापूरचे २००-३०० वाहने उभी असतात. त्यामुळे भक्तांना चालता येत नाही. नव्याने करण्यात येणाऱ्या रस्त्यांच्या फुटपाथवर अतिक्रमणे होणार नाही, रस्त्यावर गाड्या थांबणार नाहीत या दृष्टीने नियोजन करणे आवश्यक आहे. मुख्यत: शिर्डी शहराची वाहतूकीची समस्या नाहीसी होऊन विस्थापितांची योग्य सोय व्हावी या दृष्टीने योग्य नियोजनाची आवश्यकता आहे. संस्थानने शेती महामंडळाकडून संपादीत केलेल्या १२० एकर क्षेत्राचाही नियोजनात समावेश करावा.

तसेच प्रदुषण होऊ नये याकरिता कर्जत जवळील माथेरानला जसे वाहने थेट नेऊ देत नाहीत त्याप्रमाणे शिर्डी येथे केले तर प्रदुषण कमी होईल. वाहतुकीचीही कोंडी होणार नाही. संस्थानकडे सर्व निधी मागण्यासाठीच येतात. देण्यासाठी कोणी येत नाही. या आराखड्याचे अंमलबजावणीसाठी आवश्यक निधीपैकी संस्थानने गुंतवणूकीचे स्वरुपात जास्तीत जास्त २०% पर्यंत अंशदान करावे. ही

गुंतवणूक परत मिळाली पाहिजे इतर निधी रस्ते विकास महामंडळातर्फे उभारण्यात यावा असे त्यांनी सांगितले.

मा.श्री.अनिलकुमार लखीना, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांनी सांगितले की, मी शिर्डी येथे २४ वर्षांपासून येतो. या काळात संस्थानची वाढ होताना मी पाहीली आहे. आतापर्यंत साईबाबा संस्थान केंद्र बिंदू ठेवून विकास झाला आहे. त्याप्रमाणे शिर्डी शहराचा विकास होणे आवश्यक आहे. शिर्डीच्या मुख्यत: तीन समस्या आहेत.

०१. वाहतूक व्यवस्था- बस,जीप,कार इत्यादी विविध वाहनांमधुन येणाऱ्या भक्तांच्या वाहनांकरीता रस्ते, वाहनतळ इत्यादी

०२. रेस्टॉरंट, लॉजिंग, दुकानांची बाजार पेठ मंदीराच्या फारच जवळ आहेत.

०३. दर्शनव्यवस्था तसेच भक्तांनी दर्शन घेतल्यानंतर मनोरंजनासाठी तसेच निवांतपणा मिळावा असे स्थान नाही.

संस्थान परिसरातून बाहेर आल्यानंतर वरील समस्यांमुळे भक्तांचा गोंधळ होतो. नगरपंचायतीचा विकास आराखडा योग्य आहे. परंतू त्यानुसार बाजारपेठेची व्यवस्था नाही. संस्थानच्या जवळपासच बाजारपेठ आहे. एस.टी.बस स्थानक जवळच आहे. त्यामुळे तेथे कितीतरी बसेसची ये-जा होत असते. बस डेपो शहरापासून बाहेर असावा.

मंदिराच्या जवळ बाजारपेठ असणे, शॉपिंग कॉम्प्लेक्स बांधणे यास मी सहमत नाही. मंदिराच्या आजुबाजुला मोकळी जागा आवश्यक आहे. संस्थानने सुद्धा विकास कामे करताना मंदिराचे जवळपास इमारतीचे बांधकाम करु नये. याकरिता भविष्याच्या दृष्टीने विचार करणे आवश्यक आहे. रुपये १० कोटीचे उत्पन्नावर रुपये १०० कोटीचा प्रकल्प करता येतो या प्रकल्पासाठी संस्थानकडून मला १०% अथवा कमी निधीची आवश्यकता पडेल. यासाठी सक्षम अधिकारी असलेली ॲथॉरिटी पाहिजे. याकरिता तसेच टोल कलेक्शनसाठी परवानगीची आवश्यकता आहे.

वरीलप्रमाणे नमूद केलेल्या सर्व बाबी विचारात घेऊन एम एस आर डी सी चे कन्सल्टंट यांचे सहकार्याने प्रथमत: विकास आराखडा तयार करणे, यासाठी स्वतंत्र विशेष नियोजन प्राधिकरण नेमणे म्हणजे कुठल्याही प्रकारचा हस्तक्षेप न होता वेगाने काम होईल. यासाठी शासनाची मान्यता घ्यावी लागेल.

मा.आमदार श्री.विखे पाटील यांनी सांगितले की, शिर्डी शहराचा विकास नगरपंचायत व संस्थान यांनी एकत्रीतपणे करणे गरजेचे आहे. संस्थान चांगली व्यवस्था करीत आहे. नगरपंचायत ही शासकीय व्यवस्था आहे. या परिस्थितीत विकास आराखडा तयार करणे कामी नियोजन प्राधिकरणाची स्थापना करुन सर्वांना अभिप्रेत असलेला शिर्डीचा विकास आराखडा तयार करावा. शिर्डी करिता पंचतारांकीत दर्जाचे रेल्वे स्टेशन होत आहे, त्याचीही माहिती घ्यावी. विकासासाठी संस्थानचा पूर्ण पाठींबा राहील परंतू काम वेगाने व्हावे आमची सर्वांची हीच भावना आहे. शिर्डीत भक्तांसाठी व ग्रामस्थांसाठी चांगल्या सुविधा देण्याचे कामाकरिता नगरपंचायतीनेही प्रस्ताव तयार केला आहे. त्याची प्रत मा.श्री.अनिलकुमार लखीना यांना देण्यात आली.

सध्या चालु असलेली रस्त्याची कामे आठ दिवस बंद ठेवावीत या कालावधीत रस्त्याची पहाणी करुन आवश्यक योग्य मार्गदर्शन संस्थानला देऊ असे श्री.मराठे यांनी सांगितले.

शिर्डी विकास आराखड्यामध्ये रस्त्यावरील फुटपाथवर अतिक्रमण होऊ नये, ओव्हर ब्रीज, अंतर्गत रस्ते, दुकान गाळे, वाहनतळ, रस्त्यांचे सुशोभिकरण इत्यादी बाबात सविस्तर चर्चा झाली त्यावेळी व्यवस्थापन समिती सदस्य सर्वश्री मा.पांडूरंग अभंग, डॉ.एकनाथ गोंदकर, मा.कैलास कोते, मा.सुरेश वाबळे यांनी चर्चेत भाग घेतला.

वरीलप्रमाणे नमूद केलेल्या बाबींवर सर्व साकल्याने विचार करुन तांत्रिक दृष्ट्या योग्य असा विकास आराखडा तयार करु असे, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या उपस्थित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले.

वरील निर्णय क्र. ६५ सर्वानुमते घेण्यात आला आहे.

यानंतर सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

स्वाक्षरीत/-
(भाऊसाहेब रा.वाकचौरे)
कार्यकारी अधिकारी
श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समिती,शिर्डी

स्वाक्षरीत/-
(जयंत मुरलीधर ससाणे)
अध्यक्ष
श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समिती,शिर्डी